नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०८/०५/२०२५ (गुरूवार)

## फोनद्वारे क्रिकेटसट्टा /बेटिंग लावुन जुगार खेळविणाऱ्यांवर गुन्हा नोंद स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई १ आरोपी अटक

दिनांक ०७/०५/२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा यांच्या पथकाला गुप्तबातमीदारा मार्फतीने माहीती प्राप्त झाली की, **काटोल येथे धवड पेट्रोलपंप चे बाजुला आ.यु.डी.पी. कॉलनी येथे रोडवर निलेश रामराव हुमने नावाचा इसम भारतात सुरू असलेल्या आय.पी. एल. २०—२० च्या क्रिकेट सामन्यांमधील कोलकाता नाईट राइडर्स विरुद्ध चैन्नई सुपर किंग्स् यांच्यात सुरू असलेल्या क्रिकेट सामन्यावर मोबाईल फोन द्वारे लोकांकडुन पैशाची खायवाडी करून क्रिकेटचे खेळावर पैशाचे हारजितचा जुगार खेळत व खेळवित आहे.** मिळालेल्या माहीतीच्या आधारे सदर पथकाने पंचासमक्ष नमुद घटनास्थळी जावुन सापळा रचुन धाड टाकली असता आरोपी क्रं **१) निलेश रामराव हुमने, वय ३२ वर्षे, रा. पेठ बुधवार, काटोल** हा स्वत:चे आर्थिक फायदया करिता पैशाचे हारजीतवर Nice24.fun या ॲपद्वारे आयडी क्र BS16030(Nnmn) वरून क्रिकेट बेटींग/जुगार खेळत व खेळवित असताना व पैशाची खायवाडी करीत असताना पंचांसमक्ष मिळून आला. नमुद आरोपीस अधिक विचारपुस केली असता त्याने सांगीतले की, आरोपी क्रं २) नामे युनुस शेख, रा. पेठ बुधवार, काटोल याचे कडुन Nice24.fun या ॲप वरील आयडी क्र BS16030(Nnmn) ही आयडी ५०००/— रूपयाला खरेदी केल्याचे सांगितले. **नमुद आरोपी च्या ताब्यातुन १) १ अँड्रॉइड मोबाइल किंमती १५,०००/— रूपये ,२) रोख रक्कम ३०००/— रूपये असा एकूण १८,०००/—रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.**

**वर नमुद १) निलेश रामराव हुमने, वय ३२ वर्षे,रा. पेठ बुधवार, काटोल आणि आरोपी क्र २) नामे युनुस शेख, रा. पेठ बुधवार, काटोल यांच्या विरूध्द पोलीस स्टेशन काटोल येथे कलम १२(अ) मजूका सह कलम ४९ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपी क्र १ नामे निलेश रामराव हुमने, वय ३२ वर्षे,रा. पेठ बुधवार काटोल याला अटक करण्यात आली आहे.**

## अवैधरित्या दारू बाळगणा—या/विक्री करणाऱ्या आरोपीतांवर नागपुर ग्रामीण पोलीसांची कारवाई ४ आरोपी विरूध्द ४ गुन्हे नोंद एकुण २३,५३०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त

नगपुर ग्रामीण जिल्हयात **दिनांक ०७/०५/२०२५** रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत पोलीस स्टेशन भिवापुर — ०१ गुन्हा नोंद , केळवद — ०१ गुन्हा नोंद ,खापा— ०१ गुन्हा नोंद, काटोल — ०१ गुन्हा असे गुन्हे नोंद केले आहे. पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन **देशी दारू, मोहाफुल दारू, गुन्हा करण्यासाठी वापरलेले दुचाकी वाहन असा एकुण २३,५३०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ४ आरोपीतांवर ४ गुन्हे दाखल केले आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने